# महाराष्ट्र शासन
## आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
## DIRECTORATE OF AYUSH, MAHARASHTRA STATE, MUMBAI.

शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

कार्यालय - दुरध्वनी व फॅक्स - ०२२-२२६२६००७ संचालक : ०२२-२२६२२२४७

ई-मेल : directorayurvedmaha@gmail.com वेबसाईट : www.mahayush.gov.in


क्र.आसंमुं/शै.व.२०२०-२१/गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती/२०२०/आयु-२/ 14956-58 दि. 16 DEC 2020

प्रति,

अधिष्ठाता / प्राचार्य,

शासकीय / शासन अनुदानित / विनाअनुदानित,

आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य

विषय : **सन २०२०-२१ साठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती ( मेरीट - कम - मिन्स) योजनेच्या कार्यवाहीबाबत.**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रं १८/ तंशिसं/एमसीएम / संस्था- पत्र / २०२०-२१/३८३ दि. ०८.१२.२०२० ( ईमेल - desk१८@dtemaharashtra.gov.in )

उपरोक्त विषयानुसार, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत केंद्र शासनाच्या National Scholarship Portal व्दारे राबविली जाणारी गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत या संचालनालयाचे पत्र दि१०.०९.२०२० अन्वये यापुर्वीच आपणास सुचित करण्यात आले आहे.

सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनेच्या कामकाजाकरिता नियमित अधिकारी / कर्मचारी यांची Institute Nodal Officer (INO) म्हणून नेमणूक करावी. (सदर अधिकारी / कर्मचारी हे कंत्राटी स्वरुपाचे नसावेत). तसेच, नेमणुक करण्यात येणाऱ्या Institute Nodal Officer (INO) चे नाव व मोबाईल नं तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व या संचालनालयास ईमेलव्दारे कळविण्यात यावे.

तसेच नमुद करण्यात येते की, Institute Nodal Officer (INO) हा पोर्टलवरील योजनांच्या अंमलबजावणीसाठी व विद्यार्थ्यांच्या अर्जांच्या तपासणीसाठी जबाबदार असेल याची नोंद घ्यावी. संस्थांनी प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज अंतिम मुदतीपर्यंत प्रलंबित न ठेवता त्वरीत छाननी करुन कार्यवाही करावी. जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहिले व कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. त्याचप्रमाणे, सोबतचे संदर्भित पत्राचे अवलोकन करुन, तंत्रशिक्षण संचालनालयाने दिलेल्या सर्व निर्देशाचे / मार्गदर्शनाचे तंतोतंत पालन करुन योग्य ती कार्यवाही करावी.

( वैद्य कुलदीप राज कोहली )
संचालक, आयुष
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत - १) वैद्य विजय उखळकर, प्राध्यापक, शल्यतंत्र विभाग, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती ( मेरीट - कम - मिन्स) योजनेची माहीती सर्व महाविद्यालये व सर्व पात्र विद्यार्थ्यांना होण्याकरीता, संदर्भित पत्र या संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सादर.